जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ३०४ दिनांक - ०३/०५/२०२१**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक - २, गुन्हे शाखा,पुणे शहर.

**बंद झालेल्या चलनी नोटांचा वापर करुन फसवणुक करणारे इसमास अटक**

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री अमिताभ गुप्ता यांनी पोलीस आयुक्त पुणे शहर म्हणून पदभार स्विकारल्यानंतर शहरातील अवैदय धंदे, बेकायदेशीर कृत्य करणारे गुन्हेगार तसेच शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे गुन्हेगार यांचेंवर कठोर कारवाई करुन गुन्हयांचे व गुन्हेगारांचे समूळ उच्चाटन करण्या संदर्भातील धोरण स्विकारले आहे व त्यासंदर्भात आदेश सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना दिले आहेत.

दि. ३०/०४/२०२१ रोजी सपोफौ तानाजी कांबळे यांना गोपनीय बातमीदाराकडुन मिळालेल्या बातमी वरुन इसम नामे आण्णासाहेब अर्जुन घायतिडक वय ३६ रा.रेंजहिल्स खडकी पुणे याचे राहते घरी दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-२ चे अधिकारी व अंमलदार यांनी पंचासह छापा टाकल असता त्याचे राहते घरात जुन्या बंद झालेल्या १०००/- रु दराच्या ५६ नोटा दर्शनी भागावर लावुन त्याखाली ९९ भारतीय मनोरंजन बँक असं लिहिलेल्या बनावट नोटा लावुन ५६ बंडल तयार केलेले सदर बनावट नोटांवर भारतीय मनोरंजन बँक असे नमुद असुन त्यावर अक्षरी व अंकात १०००/- रु, महात्मा गांधी यांचे चित्र छापलेले व हुबेहुब जुन्या बंद झालेल्या १०००/- रु सारखे दिसणा-या नोंटा तसेच ५००/- रु नोंटांसारखे हुबेहुब दिसणा-या ४०० नोटा त्यावर भारतीय रिव्हर्स बँक असे छापलेले व महात्मा गांधी यांचे चित्र असलेल्या राहते घरी मिळुन आल्या. तसेच आरोपी याचे टाटा सफारी गाडी मध्ये वरील प्रमाणेच १०००/- रु चे बंद झालेल्या नोटां प्रमाणे हुबेहुब दिसणारे नोटांचे २३२ बंडल असे ६ गोण्यांमध्ये मिळुन आले. अशा एकुण २८८ नोटांचे बंडल कि रु २४,३५,४४०/-, टाटा सफारी गाडी कि रु ३ लाख व १००/- दराची सँग असा एकुण २७,३५,५४०/- चा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे. सदर अटक आरोपी याने सदर नोटांचा वापर लोकांची फसवणुक करण्याकरीता करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

तसेच सुमारे दोन महिण्यापुर्वी इसम नामे संतोष रामचंद्र राजे वय ४३ रा. सातारा याचीही वरील अटक आरोपी नामे आणासाहेब अर्जुन घायतिडक व त्याचा पाहिजे साथीदार नबाब अल्ली रा.संजय पार्क पुणे यांनी त्यांचेकडे २०० करोड जुन्या बंद झालेल्या १०००/- रु दराच्या भारतीय चलनी नोटा असल्याचे भासवुन सदर नोटा अनिवासी भारतीय लोकांच्या असुन त्यास आर.बी.आय बँकेने बदलुन देण्याची परवानगी दिली आहे असे सांगुन सदर नोटा साक्षीदार संतोष राजे यास लांबुन दाखवुन त्या बंद झालेल्या १०००/- रु दराच्या ख-या नोटा असल्याचे भासवुन त्या बदल्यात बँकर अथवा फायनान्सरने ५० टक्के भारतीय चलनातील २०००/- रु दराच्या चालु नोटा आणल्यास ५ टक्के कमिशन देवु असे अमिष दाखविले. साक्षीदार संतोष राजे याचेकडुन नोटा बदलीच्या कामाचे बदल्यात प्रथम डिपॉझीट म्हणुन ४ लाख रुपये आर टी जी एस व्दारा ट्रान्सफर करुन घेतले. साक्षीदार संतोष राजे यास बँकर न मिळाल्याने त्याने डिपॉझिट म्हणुन दिलेले ४ लाख रककम आरोपीकडे वेळोवेळी मागितली असता ती रककम न देता फसवणुक केली.

तसेच आरोपी याने बंद झालेल्या १०००/- रु दराच्या नोटा व मनोरंजनाच्या १०००/- दराच्या नोटा स्वतःचे फायदयासाठी व लोकांची फसवणुक करण्याकरीता जवळ बाळगल्या असताना मिळुन आल्याने आरोपी विरुध्द भा.द.वि. कलम ४८९क, ४२०, ३४ व द स्पेसिफाईड बँक नोटस ॲक्ट २०१७ चे कलम ७ अन्वये खडकी पोलीस स्टेशन येथं गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी आण्णासाहेब अर्जुन घायतिडक रा.रेंजहिल्स खडकी पुणे हा ५२१ ए एस सी सेंटर बटालीयन गुहाटी येथे शिपाई या पदावर कार्यरत असुन तो फेब्रुवारी २०२० पासुन कर्तव्यावर गैरहजर आहे.त्यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास खडकी पोलीस स्टेशन करीत असुन अशा प्रकारे कोणाची फसवणुक झाली असल्यास खडकी पोलीस स्टेशन येथे संपर्क साधने बाबत आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त,श्री.अमिताभ गुप्ता, मा.सह पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र शिसवे, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, श्री अशोक मोराळे, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.श्रीनिवास घाडगे, मा.सहा पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री.लक्ष्मण बोराटे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक,श्री.सुनिल पंधरकर, पोलीस उप निरीक्षक गुंगा जगताप, सहा.पोलीस उप निरीक्षक, तानाजी कांबळे, पो.हवा.अभंगे, पो.हवा.लोंखडे, पो.हवा.शिंदे, पो.हवा.खान, पो.हवा.काळभोर, पोना.मनोज खरपुडे, पोना.शिवाजी जाधव, पो.शि.अमोल सरतापे यांनी केली आहे.